शैक्षणिक संदर्भ अंक १२८ फेब्रुवारी - मार्च २०२१

# सातवा माणूस

## (भाग २)

लेखक : हारुकी मुराकामी अनुवाद : यशश्री पुणेकर

# सातवा माणूस

## (भाग २)

लेखक : हारुकी मुराकामी अनुवाद : यशश्री पुणेकर

*वादळ येऊन गेलं होतं.सगळीकडे उद्ध्वस्त झालेलं दिसत होतं. दोन लहान मुलं समुद्रकिनारी झालेली वाताहत बघत होती. तेव्हा नेमकं काय घडलं, त्याचा परिणाम मुलाच्या आयुष्यावर कसा झाला ... वाचा गोष्टीचा दुसरा भाग.*



असं दृश्य मी आधी कधीच बघितलं नव्हतं. मी लहान होतो तरी पण समुद्र बघत बघतच मोठा होत होतो. समुद्र किती भयावह होऊ शकतो हे मला चांगलंच माहिती होतं. समुद्र कोणतीही सूचना न देता अतिशय क्रूरपणे वार करू शकतो, म्हणूनच मी लाटा येण्याच्या जागेपासून बराच आत थांबलो होतो. असं असूनही लाटा माझ्यापासून काही इंचापर्यंत पोचत होत्या आणि पुन्हा आवाज न करता समुद्रात जात होत्या...पुन्हा पुन्हा.

ज्या लाटा माझ्यापर्यंत येत होत्या त्या वारंवार येत राहिल्या...जणू काही त्या समुद्र किनारा धुवून काढत होत्या.  पण मला त्या लाटांमध्ये काहीतरी अनिष्ट असल्याची जाणीव होत होती. त्यांचा स्पर्श एखाद्या सापाच्या कातडीसारखा होता...माझ्या अंगावर शहारे आले.

माझी ही भीती अनाठायी असूनही स्वाभाविक होती. माझ्या  समजुतीनुसार या लाटा जिवंत आणि सक्रीय होत्या...हो, त्या नक्कीच जिवंत होत्या..... त्यांना माहिती होतं की मी तिथेच आहे आणि मला गिळायला त्या पुढे पुढे सरकत होत्या. एखाद्या मोठ्या हिंस्र जनावराने गवतात दबा धरून सावजाची वाट बघावी आणि संधी येताच सावजाला पकडून त्याचे लचके तोडावे तशा त्या संधीची वाट बघत होत्या. आता मला इथून पळून गेलं पाहिजे.

“मी जातोय रे” मी ओरडून ‘क’ ला सांगितलं. तो माझ्यापासून साधारण दहा मीटर अंतरावर होता. तो माझ्याकडे पाठ करून पालथी मांडी घालून वाळूवर वाकून काहीतरी बघत होता. मी खरंतर खूप जोरजोरात ओरडून त्याला सांगितलं पण बहुधा त्याला माझा आवाज ऐकूच गेला नाही. कदाचित तो ती वस्तू बघण्यात इतका गुंगला होता की माझ्या ओरडण्याचा काही परिणाम झालाच नसेल.  ‘क’ असाच होता.  एखाद्या कामात इतका खोलवर बुडून जात असे की इतर सगळं विसरूनच जायचा. किंवा मी जेवढ्या जोरात हाक मारायला हवी होती तेवढ्या जोरात ओरडलो नसेन. मला माझा आवाज ओळखूच येत नव्हता...काहीतरी चमत्कारिक आवाजात मी ओरडत होतो. जणू काही दुसरंच कोणी ओरडतंय.

मग मला एक मोठी गर्जना ऐकू आली...सगळी धरती थरथरत असल्याचा भास झाला. त्याच्याही आधी मला एक वेगळाच गडगडाट ऐकू आला होता. जमीन फोडून

पाण्याचा लोंढा वेगात बाहेर येताना येईल तसा तो भीतीदायक आवाज.....थोड्या वेळाने तो आवाज बंद झाला आणि मग ही गर्जना...

पण इतके मोठे आवाज होऊन सुद्धा 'क' ने मागे वळून बघितलं नाही. तो तसाच पालथी मांडी घालून त्या वाळूवर पडलेल्या वस्तूकडे एकाग्रतेने बघत होता. बहुतेक त्याला ती लाटेची गर्जनाही ऐकू आली नाही. कमाल आहे..... इतका मोठा आवाज कसा ऐकला नाही त्याने ! का तो विशिष्ट आवाज फक्त मलाच ऐकू येत होता? नवल म्हणजे त्याच्या कुत्र्यानेही या आवाजाची दखल घेतली नाही....कुत्री अशा बाबतीत किती संवेदनशील असतात....



मी स्वतःला बजावलं की आता मलाच जाऊन 'क' ला तिथून उठवून इकडे आणलं पाहिजे.....आत्ता हे काम फक्त मीच करू शकतो. एक राक्षसी लाट आमच्याकडे झेपावत होती आणि 'क' याबाबत अगदी अनभिज्ञ होता....


वास्तविक मी काय करायला हवंय हे माझ्या डोक्यात अगदी स्पष्ट होतं पण प्रत्यक्षात मात्र मी उलट्या दिशेने एकटाच पळत गेलो...माझ्याही नकळत मी त्या दगडी भिंतीकडे पळत सुटलो. भीती....भीतीमुळेच मी असा पळत सुटलो असेन....या भीतीने माझ्यावर संपूर्ण ताबा मिळवला होता...माझा आवाज फुटेना आणि पाय मात्र वेगाने पळत सुटले....त्या ओल्या वाळूवर पडत धडपडत मी कसाबसा त्या दगडी भिंतीजवळ पोचलो. तिथे पोचल्यावर मी मागे वळून बघितलं... 'क' चं लक्ष वेधून घेण्यासाठी खच्चून ओरडलो... ''पळ.. 'क' पळ.

किती मोठी लाट येतीय बघ. लवकर ये इकडे'' हा आवाज मात्र खरा होता. गर्जनेचा आवाज कमी झाला होता. शेवटी एकदाचा 'क' ने माझा आवाज ऐकला आणि वर बघितलं. पण आता खूपच उशीर झाला होता. एखादा विशाल नाग डसण्यासाठी मोठा फणा उभारून यावा तशी लाट किनाऱ्याकडे घोंघावत येत होती. मी इतकी भयानक लाट आधी कधीच बघितली नव्हती. जवळजवळ तीन मजली इमारतीइतकी उंच होती ती ! काहीही आवाज न करता (माझ्या डोक्यात ते चित्र बिनआवाजाचंच आहे) ती प्रचंड लाट 'क' च्या मागे उभारून आली आणि तिने त्याच्या मागचं सगळं आकाश झाकून टाकलं. 'क' काही क्षण माझ्याकडे बघत राहिला, त्याला काहीच समजत नव्हतं. त्याला जरा चाहूल लागताच मागे वळून त्याने लाटेकडे बघितलं. तो मागे उलटा पळण्याचा प्रयत्न करू लागला पण आता तितका वेळच उरला नव्हता... ती लाट एखाद्या वेगात धावणाऱ्या रेल्वेच्या इंजिनासारखी त्याला जोरात येऊन धडकली आणि पुढच्याच क्षणी त्या राक्षसी लाटेने त्याला अख्खाच्या अख्खा गिळून टाकला.

ती लाट किनाऱ्यावर धडकून अनेक लाटांमध्ये विखुरली. त्या लाटा उसळून दगडी भिंतीवरून पलीकडे गेल्या. त्यांच्या तडाख्यातून वाचण्यासाठी मी वाकून त्या दगडी भिंतीला चिकटून उभा राहिलो. सगळे कपडे भिजले पण मला काही नाही झालं.....मी उठून त्या भिंतीवर चढून उभा राहिलो. समुद्राचा अंदाज घेऊ लागलो. त्यावेळी ती भयानक लाट वळून भीतीदायक आवाज करत समुद्रात परत जात होती. पृथ्वीच्या दुसऱ्या टोकावरच्या एखाद्या अतिशक्तिशाली हाताने एखादं जाजम झटकून पुन्हा आपल्याकडे ओढून घ्यावं अशी ही घटना घडली. किनाऱ्यावर कुठेही 'क' आणि त्याचा कुत्रा यांचं नामोनिशाणही दिसलं नाही. तिथे फक्त ओली वाळू पडली होती. जाताना त्या लाटेने इतकं पाणी आपल्याबरोबर खेचून

नेलं की असं वाटत होतं समुद्राचा तळच दिसेल. त्या भिंतीवर मी दिग्मूढ होऊन निश्चल उभा राहिलो.


सगळीकडे भयंकर स्तब्धता पसरली......इतकी भयाण शांतता, जणू काही पृथ्वीवरचा सगळा आवाज कोणीतरी उखडूनच टाकलाय. ती राक्षसी लाट 'क' ला गिळून कुठेतरी गायब



झाली. मी सुन्न उभा होतो. मला काहीही समजत नव्हतं. मी पुन्हा किनाऱ्यावर जाऊ का? कदाचित 'क' तिथेच वाळूत रुतून पडला असेल...काय करू....मला काही सुचत नव्हतं. पण मी ती दगडी भिंत ओलांडून जाऊ शकलो नाही.

माझ्या अनुभवानुसार अशा राक्षसी लहरी एकापाठोपाठ दोन तीन येतात. त्या भयावह रिकामपणाचे साधारण दहा बारा सेकंद झाले असतील... मला कळतच नव्हतं किती वेळ गेला...तितक्यात मला वाटलं होतं तशी आणखी एक भयानक मोठी लाट आली..एक प्रचंड मोठा आवाज झाला. समुद्र किनारा थरथरू लागला. आवाज कमी झाल्याच्या क्षणी त्या लाटेने आपला फणा उगारत पुढे यायला सुरुवात केली. त्या मोठ्या लाटेने आकाश झाकोळून टाकलं, जणू काही एखादा मोठा खडकच असावा....पण मी यावेळी पळालो नाही. संमोहित झाल्यासारखा त्या लाटेकडे बघत भिंतीला चिकटून उभा राहिलो. आणि आता पळूनही काय फायदा...माझ्या मित्राला तर लाटेने नेलंच होतं. किंवा मी भीतीने थिजून तिथे उभा राहिलो असेन. कशाने मला तिथे जखडून ठेवलं होतं हे मला आजही समजलेलं नाही. दुसरी लाटही

पहिली सारखीच राक्षसी होती....कदाचित तिच्याहूनही मोठी. माझ्या डोक्यावरून खूप उंचावरून ती खाली पडू लागली. एखादी खूप मोठी इमारत पडताना जसा भिंती कोसळत विटांचा ढीग पडू लागतो तशी ती फुटून विखरू लागली. ती इतकी प्रचंड होती की ती खरी वाटतंच नव्हती...जणू काही दूरच्या कुठल्या जगातून येऊन एखाद्या वस्तूने विराट रूप धारण करावं अशी ती! ती मला कोणत्याही क्षणी गिळून टाकणार अशी मी मनाची तयारी करू लागलो. मी डोळे बंद करायचंही विसरलो.... विस्फारलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे बघतच राहिलो... विश्वास बसणार नाही अशा रीतीने मला माझ्या हृदयाचे ठोके ऐकू येत होते....धाड धाड....



ज्या क्षणी ती राक्षसी लाट माझ्या समोर आली त्याक्षणी ती जणू काही अचानक थांबली. असं वाटलं की तिची सगळी शक्तीच नष्ट झालीय, पुढे जाण्याची तिची गतीच थांबलीय, आणि ती तिथेच रेंगाळत चुपचाप खाली पडतीय. आणि तिच्या टोकावर...तिच्या क्रूर पारदर्शक जिभेवर मला ‘क’ दिसला.....

तुम्हाला कोणाला हे सगळं अशक्य आणि अविश्वसनीय वाटेल. मी तुम्हाला दोष देत नाही कारण मला स्वतःलासुद्धा आजही या गोष्टीचा स्वीकार करणं कठीण जातं. मी यापेक्षा चांगल्याप्रकारे सांगू शकत नाही की मी त्या लाटेत काय बघितलं. पण तो माझा भ्रम नक्कीच नव्हता. त्यावेळी तिथं जे काही घडलं ते तसंच्या तसं मी तुम्हाला सांगतोय. हे असंच घडलं होतं.

त्या लाटेच्या गोलाकार कडेवर ‘क’ चा एका कुशीवर निजलेला देह दिसत होता. असं वाटत होतं की एखाद्या पारदर्शी कपड्यात गुंडाळलेला असावा. ‘क’ हसत हसत सरळ माझ्याकडेच बघत होता. तिथे, माझ्यासमोरच – इतका जवळ की मी पुढे होऊन त्याला हात लावू शकलो असतो. माझा मित्र, माझा प्रिय मित्र ‘क’ तिथे होता. काही वेळापूर्वी एक लाट त्याला घेऊन गेली होती तो मित्र..आणि तो माझ्याकडे बघून हसत होता. पण हे नेहमीचं हसणं नव्हतं. इतकं रुंद तोंड उघडून हसणं? आणि त्याचे ते थंड थिजलेले डोळे ...माझ्याकडेच बघत होते. जणू काही तो माझा ओळखीचा मित्र ‘क’ नव्हताच. त्याचे दोन्ही हातही माझ्या दिशेला पसरलेले होते. त्या हातांनी मला तो ओढून घेऊ शकला असता. पण मला खेचून घेता आलं नाही म्हणून तो आधीपेक्षा जास्तच दात विचकून हसला.

हे बघून मी बहुतेक बेशुद्ध पडलो.

जेव्हा मला शुद्ध आली तेव्हा मी बाबांच्या दवाखान्यात कॉटवर झोपलेलो होतो. मला शुद्ध येताच नर्स पळत पळत बाबांना बोलवायला गेली. बाबा धावतच माझ्याकडे आले. त्यांनी माझी नाडी तपासली, माझ्या डोळ्यांची बुबुळे बघितली आणि माझ्या डोक्यावर हात ठेवला. मी हात हलवायला गेलो तर मला काही जमेना. मला खूप ताप आला होता. माझ्या मनावर त्या घटनेचा खूपच मोठा आघात झाला होता...मी बहुतेक काही दिवस बेशुद्ध होतो आणि तापाने निपचित पडलो होतो.

“तू गेले तीन दिवस झोपूनच होतास,” बाबांनी सांगितलं. ते सगळं दृश्य बघणाऱ्या आमच्या एका शेजाऱ्याने मला उचलून घरी आणलं होतं. खूप शोधूनही ‘क’ कुठेच दिसला नाही. मला बाबांना काहीतरी सांगायचं होतं. सांगायचंच होतं...पण माझी जीभ सुजली होती आणि बधीर झाली होती. मी काही बोलूच शकत नव्हतो. जणू काही माझं तोंड कोणीतरी

बांधून ठेवलं होतं. बाबांनी मला माझं नाव विचारलं. मी काही सांगायच्या आधीच माझ्यापुढे अंधार पसरला आणि मी पुन्हा बेशुद्ध झालो.

मी जवळपास एक आठवडाभर असाच झोपून होतो. या दिवसात फक्त पातळ पदार्थ खात होतो. कितीतरी वेळेला तेही उलटून पडत होतं. मला आकडी येत असे. अंगात अजिबातच ताकद नव्हती. नंतर बाबांनी सांगितलं की माझी स्थिती खूपच वाईट झाली होती. इतका तीव्र ताप आणि मानसिक धक्का यामुळे माझं काय होईल याची त्यांना चिंता वाटत होती. या सगळ्याचा माझ्या मेंदूवर कायमस्वरूपी परिणाम होईल की काय अशी त्यांना भीती वाटत होती. कसातरी मी शारीरिकदृष्टया बरा झालो. पण आता आयुष्य फार बदलून गेलं, या घटनेनं मला पार हादरवून टाकलं.

(क्रमशः)

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक ११५ मधून साभार.*

सातवा माणूस: भाग १ https://www.sandarbhsociety.org/pdf/Issue-127/Week-06-Satwa_1-Issue-127-Shaikshanik-Sandarbh-Dec2020-Jan2021.pdf

**§§§**

---

लेखक: **हारुकी मुराकामी,** जपानी कादंबरीकार, कथालेखक आणि अनुवादक.

हिंदी अनुवाद: **सुशांत सुप्रिय**, प्रसिद्ध हिंदी कथाकार, कवी आणि अनुवादक.

चित्रे: **शिवांगी सिंह**, फाइन आर्टस् द्विपदवीधर.

मराठी अनुवाद: **यशश्री पुणेकर**, संदर्भ गटात सहभागी

*(कळीचे शब्द: कथा, चक्रीवादळ, समुद्री लाटा, हारुकी मुराकामी)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***